निर्वाह भत्याचे पुर्नविलोकन करणे बाबत.
श्री. भिमाशंकर शशिकांत देशमुख, सेवा निलंबीत, कनिष्ठ सहाय्यक, प्रा.आ.केंद्र मवेशी ता अकोले

## अहिल्यानगर जिल्हा परिषद
## सामान्य प्रशासन विभाग

जिल्हा परिषद आदेश क्रमांक साप्रवि/आस्था-३/१५२१११२/२४९/२०२६
अहिल्यानगर दिनांक - स्वाक्षरी खाली नमुद केलेप्रमाणे

वाचा:- १. इकडील निलंबन आदेश साप्रवि-१/आस्था-३/४८५/२०२५ दिनांक ०९/०५/२०२५
२. इकडील दोषारोप पत्र जा.क्र.साप्रवि-१/आस्था-३/१५२१११२/४६०/२०२५ दिनांक २१/०६/२०२५
३. श्री देशमुख यांना ज्ञापन दोषारोपपत्र बजावले बाबत पोहोच दि १५/०७/२०२५
४. इकडील विभागीय चौकशी आदेश क्र.साप्रवि-१/आस्था-३/१५२१११२/१०८०/२५ दिनांक ०९/१०/२०२५
५. गट विकास अधिकारी, पंचायत समिती कर्जत यांचेकडील पत्र .क्र.वशि/आस्था-१ ३६२/२०२६ दिनांक २७/०३/२०२६
६. महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढुन टाकणे ह्या काळातील प्रदाने) नियम १९८१ नियम ६८ (१)(ए)(दोन)

श्री. भिमाशंकर शशिकांत देशमुख, सेवा निलंबीत, कनिष्ठ सहाय्यक, हे प्राथमिक आरोग्य केंद्र मवेशी ता अकोले, येथे कनिष्ठ सहाय्यक या पदावर कार्यरत असताना त्यांनी शासकीय रक्कमेचा अपहार करुन गैरवर्तन केले आहे. श्री. देशमुख यांनी सदरचे गैरवर्तन केल्याने त्यांना संदर्भ क्रमांक १ च्या आदेशान्वये सेवेतुन सेवानिलंबित करणेत आलेले आहे.

श्री. भिमाशंकर शशिकांत देशमुख, सेवा निलंबीत, कनिष्ठ सहाय्यक, प्राथमिक आरोग्य केंद्र मवेशी, ता अकोले, यांना दिनांक ०९/०५/२०२५ पासुन सेवानिलंबन करणेत आलेले असुन सदर कालावधी हा तीन महिन्यापेक्षा जास्त झालेला आहे.

श्री. भिमाशंकर शशिकांत देशमुख, यांना सेवा निलंबीत कालावधीमध्ये उक्त संदर्भ क्रमांक ६ मधील तरतुदीनुसार निलंबन भत्ता अदा करणेत आलेला आहे. संदर्भ क्रमांक ४ नुसार श्री. भिमाशंकर शशिकांत देशमुख, यांची विभागीय चौकशी प्रस्तावित करणेत आलेली आहे.

श्री. भिमाशंकर शशिकांत देशमुख, सेवानिलंबित कनिष्ठ सहाय्यक, यांनी अद्यापपर्यंत कुठल्याच प्रकारे अपहारीत रक्कमेचा भरणा केलेला नाही. तसेच श्री. देशमुख, हे त्यांच्यावर प्रस्तावित करणेत आलेल्या विभागीय चौकशी तसेच वरिष्ठ कार्यालयाने बजावलेले टपाल स्वीकारत नसलेचे संदर्भ क्रमांक ५ नुसार कळविणेत आलेले आहे. यावरुन श्री देशमुख, हे कुठल्याच प्रकारे सहकार्य करत नसलेचे दिसुन येते. यावरुन श्री.भिमाशंकर शशिकांत देशमुख, सेवा निलंबीत कनिष्ठ सहाय्यक, हे त्यांच्या सेवानिलंबन कालावधी वाढविणेस जबाबदार असलेचे निष्पन्न होत आहे.

सबब, मी. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर संदर्भ क्र.६ मधील तरतुदीस अधिन राहुन मला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन श्री. भिमाशंकर शशिकांत देशमुख, सेवा निलंबीत कनिष्ठ सहाय्यक, यांना सेवा निलंबित केल्यानंतर **निलंबन कालावधीमध्ये देण्यात आलेला निर्वाह भत्याच्या ५० टक्के इतक्या मर्यादेपर्यंत निर्वाह भत्ता कमी करणेस मंजुरी देत आहे.** तसेच संदर्भ क्र.१ अन्वये श्री. भिमाशंकर शशिकांत देशमुख, सेवा निलंबीत कनिष्ठ सहाय्यक, यांना देण्यात आलेल्या आदेशामधील अटी व शर्तीचे काटेकोर पालन करणे त्यांच्यावर बंधनकारक राहील.

सदर आदेशाची नोंद श्री. भिमाशंकर शशिकांत देशमुख, सेवा निलंबीत, कनिष्ठ सहाय्यक, यांचे मुळ सेवापुस्तकात घेणेत यावी व तसा अहवाल सादर करावा.

सदरचा आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक ....20260508040096.... असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 08-05-2026 18:27:42

(आनंद भंडारी, भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति

श्री. भिमाशंकर शशिकांत देशमुख, **सेवा निलंबीत, कनिष्ठ सहाय्यक,**
द्वारा:- गट विकास अधिकारी, पंचायत समिती कर्जत

प्रत:- गट विकास अधिकारी, पंचायत समिती कर्जत
२/- सदरचा आदेश श्री. भिमाशंकर शशिकांत देशमुख, सेवा निलंबीत, कनिष्ठ सहाय्यक, यांना बजावणेत येवून दिनांकीत स्वाक्षरी घेतलेली प्रत या कार्यालयास विनाविलंब सादर करणेत यावी.

**प्रत:- वैद्यकिय अधिकारी, प्रा.आ.केंद्र मवेशी ता अकोले**

**प्रत:- मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर**

**प्रत:- निवड नस्ती**

स्वाक्षरी / ---
(आनंद भंडारी, भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर